३ या वर्षात यशस्वी पदार्पण
आमच्यासोबत आपला प्रवास सुखाचा होईल..
विराज ट्रॅव्हल्स
प्रवाशांच्या सहकार्यामुळे विराज ट्रॅव्हल्सची यशस्वी वाटचाल, सर्व ग्राहकांचे आभार !

पंकज गुंदेचा 9822496664 9403448649

दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी...
epaper.rayatsamachar.com
# रयत समाचार
खिंचो न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी
संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

ईश्वर टी अँड नाष्टा सेंटर
संपूर्ण महाराष्ट्रातील खवैयांची आवडती चव सावेडी उपनगरातील प्रेमदानचौकात
पोहे, समोसा, शाबुदाणा खिचडी

प्रो.प्रा. ईश्वर जायभाय- 70583 88547
प्रेमदानचौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ४६० वा • बुधवार, ता. ०३ डिसेंबर २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००

## २६४ नगरपरिषदांमध्ये मतदान पूर्ण; काही भागात शांतता तर काही राडा

### निवडणुकीत महायुती-मविआ आमने-सामने

**मुंबई । रयत समाचार (विशेष प्रतिनिधी)**

**महाराष्ट्रातील बहुप्रतीक्षित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात काल (२ डिसेंबर) २६४ नगरपरिषदा आणि नगरपंचायतींमध्ये मतदानाची प्रक्रिया शांततेने सुरू झाली. मात्र, विविध भागांत झालेल्या हिंसाचाराच्या घटना आणि निवडणूक आयोगाच्या विलंबित निर्णयांमुळे राजकीय वातावरण तापले आहे.**

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने आज मतमोजणीची तारीख ३ डिसेंबरऐवजी २१ डिसेंबर करण्याचा आदेश दिला असून, यामुळे महायुती आणि महाविकास आघाडी (एमव्हीए) यांच्यातील स्पर्धा आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. एकूण ६,०४२ सदस्यपदे आणि २६४ नगराध्यक्षपदांसाठी होणाऱ्या या निवडणुकीत ७.९४ टक्के मतदारांनी पहिल्या दोन तासांत मतदान केले, अशी माहिती राज्य निवडणूक आयोगाने (एसईसी) दिली. निवडणूक आयोगाने नुकतीच २४ नगरपरिषदांतील १५४ सदस्यपदांसाठी मतदान २० डिसेंबरला स्थगित केले असून, यामुळे एकूण २२२ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींमध्ये काल मतदान झाले. मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते संध्याकाळी ५.३० पर्यंत होती. यावेळी इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशिन (ईव्हीएम) वापरली गेली, विशेषतः महिलांसाठी ३,४९२, अनुसूचित जातींसाठी ८९५ आणि अनुसूचित जमातींसाठी ३३८ जागा राखीव ठेवण्यात आल्या होत्या. मात्र, आरक्षणाच्या ५० टक्के मर्यादेच्या मुद्द्यावर सुप्रीम कोर्टात सुरू असलेल्या खटल्यामुळे निवडणूक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

**काल दिवसभराच्या प्रमुख घटना :** हिंसाचार, तक्रारी आणि राजकीय प्रतिक्रिया सकाळी ७.३० वाजता मतदानाला सुरुवात : राज्यभरातील २०० हून अधिक मतदान केंद्रांवर सकाळीच मतदारांची गर्दी दिसून आली. रत्नागिरी, वर्धा, धुळे आणि पुणे जिल्ह्यांत विशेष व्यवस्था करण्यात आल्या होत्या. धुळे जिल्ह्यातील सिंडखेडा तालुक्यात एका कुटुंबाने वयोवृद्ध मतदाराला खांद्यावर घेऊन मतदान केंद्रापर्यंत नेले, ज्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर वायरल झाला. मात्र, बुलढाणा जिल्ह्यात काँग्रेसने बोगस मतदानाच्या तक्रारी नोंदवल्या असून, दोन संशयितांना पकडण्यात आले आहे.

**दुपारी १२ वाजेपर्यंत हिंसाचाराच्या घटना :** गेवराई (बीड) येथे भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये झालेल्या राड्यामुळे मतदान प्रक्रिया काही वेळ थांबली. वर्धा आणि लोणावळा येथेही किरकोळ मारहाणीच्या घटना घडल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनांचा समाचार घेत एसईसीला अनियमितता रोखण्यासाठी कठोर पावले उचलण्याचे निर्दे श दिले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हिंसाचाराची निंदा करत गठबंधन धर्म पाळण्याचे आवाहन केले. पालघर जिल्ह्यात दहानू, जव्हार आणि वाडा तालुक्यांत सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली असून, ३११ परवानगीप्राप्त शस्त्रे जमा करण्यात आली आहेत.

**दुपारी २ वा. : उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण आदेश :** नागपूर खंडपीठाने याचिकांवर सुनावणी करत मतमोजणी २१ डिसेंबरला करण्याचा आदेश दिला. याचिकांमध्ये नामांकन प्रक्रियेच्या अनियमिततेचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. न्यायालयाने २० डिसेंबरपर्यंत एक्झिट पोल बंदीही घातली आहे. या निर्णयावर भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी एसईसीचा निर्णय चुकीचा असल्याचे म्हटले, तर काँग्रेसने गोंधळाचे चित्र असल्याची टीका केली.

**संध्याकाळी ५ वा. :** मतदान संपण्यापूर्वी अपेक्षित टर्नआऊट : गोदिया जिल्ह्यात २० टक्के, तर वाशिममध्ये १८ टक्के मतदान झाले. एकूण मतदारसंख्येपैकी ५१ टक्क्यांहून अधिक मतदान अपेक्षित असल्याचे एसईसीने सांगितले. मात्र, काही भागांत ईव्हीएम ग्लिचच्या तक्रारी नोंदवल्या गेल्या. राजकीय पक्षांची रणनीती आणि अपेक्षा महायुती (भाजप-शिवसेना(शिंदेगट)-एनसीपी(अजित पवार गट) आणि एमव्हीए (काँग्रेस-शिवसेना-युबीटी-एनसीपी-एसपी) यांच्यातील लढत ही विधानसभा निवडणुकीतील निकालांची पुनर्रचना ठरेल, असे राजकीय विश्लेषक सांगतात.

भाजपकडून ५१ टक्क्यांहून अधिक मतांचा हिस्सा अपेक्षित असल्याचे मंत्री बावनकुळे यांनी म्हटले. दुसरीकडे, एमव्हीएने भ्रष्टाचार आणि अनियमिततेविरोधात लढा असा प्रचार केला. मनसे, वंचित बहुजन आघाडी (व्हीबीए) आणि राष्ट्रीय समाज पक्ष (आरएसपी) यांसारखे छोटे पक्षही मैदानात आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या ३१ जानेवारी २०२६ पर्यंत सर्व निवडणुका पूर्ण करण्याच्या आदेशामुळे हा पहिला टप्पा महत्त्वाचा ठरतो. जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि महानगरपालिकांच्या निवडणुका पुढील टप्प्यात होणार आहेत.

निवडणूक आयोगाने काल सार्वजनिक सुट्टी जाहीर केली होती, दारू विक्री बंद ठेवण्यात आली . मतमोजणीसाठी तयारी सुरू असली तरी उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे राजकीय पक्षांसाठी प्रचाराची संधी वाढली आहे. आज (३ डिसेंबर) अपेक्षित निकालाऐवजी आता २१ डिसेंबरपर्यंत प्रतीक्षा करावी लागेल.

## दक्षिण-पूर्व आशियात १,२३०हून अधिक बळी
## चक्रीवादळांचा तिहेरी हल्ला



**कोलंबो । रयत समाचार**

**गेल्या आठवडाभरात बंगालच्या उपसागरात आणि अंदमान समुद्रात एकाच वेळी निर्माण झालेल्या तीन चक्रीवादळांनी (डिटवाह, सेन्यार आणि बँगलाई) दक्षिण व दक्षिण-पूर्व आशियावर अभूतपूर्व हल्ला चढवला.**

श्रीलंका, इंडोनेशिया आणि थायलंडमध्ये पूर आणि भूस्खलनामुळे आतापर्यंत १,२३० हून अधिक जणांचा मृत्यू झाला असून ८०० हून अधिक नागरिक बेपत्ता आहेत. श्रीलंकेत चक्रीवादळ 'डिटवाह'ने सर्वाधिक विध्वंस केला. मध्य डोंगराळ भागातील नुवर एलिया, बदुल्ला आणि कँडी जिल्ह्यांत ३९० हून अधिक मृत्यू झाले. चहाच्या मळ्यांमधील शेकडो कामगारवस्त्या भूस्खलनात गाडल्या गेल्या. सुमारे २.१८ लाख नागरिकांना सुरक्षित छावण्यांत हलवण्यात आले आहे

राष्ट्रपती अनुरा कुमारा दिसानायके यांनी ही "देशाच्या इतिहासातील सर्वात वाईट नैसर्गिक आपत्ती" म्हटले आहे. इंडोनेशियाच्या सुमात्रा बेटावर चक्रीवादळ 'सेन्यार'ने ६५९ जणांचा बळी घेतला. उत्तर व पश्चिम सुमात्रा प्रांतांतील पदांग सिडेम्पुआन, तापानुली आणि मंदायलिंग नाताल भागातील गावे पूर्णपणे उद्ध्वस्त झाली. २.९ लाखांहून अधिक नागरिक बेघर झाले आहेत. थायलंडच्या दक्षिणेकडील सोंगख्ला, याला आणि पट्टानी प्रांतांत १८१ जण दगावले. हॅट याई शहरात चार फूट पाणी साचल्याने रस्ते-रेल्वे वाहतूक ठप्प झाली. सुमारे ३९ लाख लोकांवर या पूराचा थेट परिणाम झाला आहे

हवामान तज्ज्ञांनी ही आपत्ती जागतिक तापमानवाढ आणि एल-निनो प्रभावाची परिणती असल्याचे सांगितले. गेल्या ५० वर्षांत अशी एकाच वेळी तीन चक्रीवादळांची नोंद पहिल्यांदाच झाली आहे. भारताने श्रीलंकेसाठी 'ऑपरेशन सागर बंधू' सुरू करून नौदलाची जहाजे, हवाई दलाची विमाने आणि वैद्यकीय पथके पाठवली. चीन, जपान, ऑस्ट्रेलिया, अमेरिका आणि संयुक्त राष्ट्रांनीही मोठ्या प्रमाणात मदत जाहीर केली आहे. ही आपत्ती पुन्हा एकदा सिद्ध करते की, हवामान बदल आता दूरचा धोका नसून प्रत्यक्ष संकट बनला आहे.

## मुस्लिम समाजातील काही व्यक्तींनीही गोशाळा उभारल्या- भाऊराव कुदळे
### विश्व हिंदू परिषदेच्या बैठकीत मार्गदर्शन



**पिंपरी । प्रदीप गांधलीकर**

ज्यांनी गायीचे जतन केले, त्यांना दूध, गोमूत्र आणि पंचगव्य देणारी गाय समाजातील समरसतेची खरी प्रतीक आहे, असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषद मुंबई व कर्णावती क्षेत्र गोरक्षा प्रमुख भाऊराव कुदळे यांनी केले. काल मंगळवारी ता. २ डिसेंबर रोजी चिंचवडगाव येथे आयोजित सामाजिक पुंज आयामाच्या बैठकीत ते पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करत होते.

या बैठकीत पिंपरीचिंचवड, कात्रज, सिंहगड, पर्वती व विद्यापीठ विभागातील सेवा, समरसता, गोरक्षा, गोसंरक्षण, धर्मप्रसार व प्रसार आयामाचे जिल्हास्तरीय पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाला समरसता पुनरुस्थान गुरुकुलम्चे अध्यक्ष पद्मश्री गिरीश प्रभुणे, विश्व हिंदू परिषद प्रांत सहमंत्री ॲड. सतिश गोरडे, प्रांत गोरक्षा सहप्रमुख भानुदास बर्गे, नितीन वाटकर, केतन घोडके, दिनेश लाड, डॉ. शर्वरी यरगट्टीकर आदी मान्यवर उपस्थित होते. कुदळे म्हणाले, गाय वाचली तर शेतकरी वाचेल आणि शेतकरी वाचला तर गाय वाचेल, कारण दोन्ही गोष्टी एकमेकांच्या अस्तित्वाला पूरक आहेत. गायीच्या दूध व गोमूत्रापासून तयार होणाऱ्या पंचगव्यातून तब्बल १०९ प्रकारची औषधे तयार केली जातात. त्यामुळे सेवा विभागाने गावोगावी बैठकींचे आयोजन करून गायींचे पालन करणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव करावा. त्यांनी विशेषत्वाने नमूद केले की, मुस्लिम समाजातील काही व्यक्तींनीही गोशाळा उभारल्या आहेत, कारण जातपातधर्म यांच्यापलीकडे गोपालनाचे लाभ सर्वांनाच मिळतात. म्हणूनच गाय ही खऱ्या अर्थाने समरसतेचे प्रतीक आहे. कार्यक्रमाची सुरुवात कै. वसंत सराफ आणि कै. अरविंद विभुते यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ श्रद्धांजली अर्पण करून झाली. ॲड. सतिश गोरडे यांनी सामाजिक पुंज आयामाचे उद्देश आणि कार्य यांची सविस्तर माहिती देत जिल्ह्यातून या उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

## केंद्र-विरोधकांमध्ये समझोता
### वंदे मातरमसह मतदार सुधारणा चर्चेला हिरवा झेंडा

**नवी दिल्ली । रयत समाचार**

लोकसभेच्या शीत सत्राच्या दुसऱ्या दिवशी आज संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी वंदे मातरमच्या १५०व्या वर्धापनदिनावर आणि मतदार नोंदणी सुधारणा () वर चर्चेची तारीख जाहीर केली. सर्वदलीय बैठकीत केंद्र आणि विरोधकांमध्ये झालेल्या चर्चे नंतर हा तोडगा सुचवण्यात आला असून, यामुळे सत्राची पुढील वाटचाल सुकर होण्याची शक्यता आहे. मात्र, विरोधकांच्या तीव्र मागणीमुळे तणाव कायम असल्याचे चित्र दिसले. लोकसभा अध्यक्ष ओम बिरला यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सर्वदलीय बैठकीत ठरले की, ८ डिसेंबरला (सोमवार) दुपारी १२ वाजता वंदे मातरमच्या १५०व्या वर्धापनदिनावर चर्चा होईल. या चर्चेची सुरुवात पंतप्रधान नरेंद्र मोदी करणार असून, त्याला १० तासांचा वेळ दिला जाईल. दुसरीकडे, ९ डिसेंबरला (मंगळवार) दुपारी १२ वाजता निवडणूक सुधारणा आणि वर चर्चा होईल. रिजिजू यांनी एक्सवर (पूर्वीचे ट्विटर) पोस्ट करून ही घोषणा केली, ज्यात त्यांनी सांगितले की, ही निर्णय सर्व पक्षांच्या सहमतीने घेण्यात आले आहेत. विरोधकांकडून वर तात्काळ चर्चेची मागणी तीव्र झाली होती. राज्यसभेत विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी सांगितले की, निवडणूक आयोगाच्या जून २०२५ मधील निर्णयामुळे लाखो मतदारांची नावे काढली जाण्याची भीती आहे, ज्यामुळे लोकशाही धोक्यात आहे. टीएमसीचे डेरेक ओब्रायन यांनी तर " मुळे लोक मरत आहेत" अशी आक्षेपार्ह वक्तव्य केले, ज्यामुळे राज्यसभेत वाकआउट झाला. मात्र, रिजिजू यांनी स्पष्ट केले की, ही निवडणूक आयोगाची प्रशासकीय प्रक्रिया असून, ती निवडणूक सुधारणांच्या व्यापक चर्चेचा भाग असेल. त्यांनी विरोधकांना "निवडणूक पराभवानंतर संसदेत राग काढू नका" असेही सुनावले. केंद्राने वंदे मातरमची चर्चा प्रथम घेण्यावर आग्रह धरला, कारण ७ नोव्हेंबरला त्याच्या रचनेच्या १५० वर्षे पूर्ण झाली. ही चर्चा स्वातंत्र्यलढ्यातील प्रेरणास्रोत आणि सांस्कृतिक वारशाचे स्मरण करून देणारी असल्याचे रिजिजू यांनी सांगितले. विरोधक मात्र ला प्राधान्य देण्यावर ठाम होते, ज्यामुळे सोमवारपासून सत्रात गोंधळ झाला आणि दोन्ही सभागृहं स्थगित झाली. आजही राज्यसभेत तासभर गोंधळ झाला, पण सर्वदलीय बैठकीनंतर तोडगा निघाल.

## 'मढं निघालंय अनुदानाला' सर्वोत्कृष्ट
### एकांकिका महोत्सवात तरुण कलावंतांचा जलवा

**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

अमर हिंद मंडळ, दादर आयोजित कै. आबा पडते राज्यस्तरीय मराठी एकांकिका स्पर्धा २०२५ची अंतिमफेरी स्वा.सावरकर सभागृह, दादर येथे उत्साही आणि खचाखच भरलेल्या प्रेक्षकांच्या उपस्थितीत रंगतदाररीत्या पार पडली. नवोदित कलावंतांना दर्जेदार मंच उपलब्ध करून देणाऱ्या या प्रतिष्ठित स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रियदर्शन जाधव, कादंबरी कदम आणि अनिकेत विश्वासराव यांनी उपस्थिती लावली, तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ अभिनेते जयवंत वाडकर यांच्या उपस्थितीमुळे



सोहळ्याला विशेष उंची प्राप्त झाली.

अंतिम फेरीत स्वातंत्र्य सौभाग्य (मुलुंड वाणिज्य महाविद्यालय), पाकिस्तानचं यान (नाट्यांकुर), द गर्दभ गोंधळ (वझे महाविद्यालय), थिम्मक्का (ज्ञानसाधना महाविद्यालय) आणि मढं निघालंय अनुदानाला (कलांश थिएटर) या पाच उत्कृष्ट एकांकिकांनी रंगत आणली. विषयवैविध्यपूर्ण प्रयोग, टोकदार संवाद, नेटकं दिग्दर्शन आणि नवोदित कलाकारांची तुफानी कामगिरी यामुळे सभागृहात क्षणोक्षणी टाळ्यांचा कडकडाट घुमत होता.

स्पर्धेचा उत्कर्षबिंदू ठरलेल्या मढं निघालंय अनुदानाला या एकांकिकेने सर्वोत्कृष्ट एकांकिका म्हणून प्रथम पारितोषिक पटकावत विजेतेपद मिळवले. पाकिस्तानचं यान द्वितीय आले, तर द गर्दभ गोंधळ आणि थिम्मक्काला उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. वैयक्तिक विभागांतही तुफान स्पर्धा पाहायला मिळाली.

अभिनय विभागात ओमकार काकडे, प्रसनजीत गायकवाड, राहुल पेडणेकर आणि अपर्णा घाघरे यांच्या प्रभावी अभिनयाची विशेष नोंद घेण्यात आली. सहाय्यक अभिनेत्री म्हणून प्रचिती जामभावकर, सहाय्यक अभिनेता विजित थिस, तर विनोदी भूमिकेसाठी सेजल जाधव यांना गौरविण्यात आले.

संपूर्ण स्पर्धेदरम्यान तरुण कलाकारांनी प्रदर्शित केलेली सर्जनशीलता, आत्मविश्वास आणि व्यावसायिकता प्रेक्षकांच्या मनाला भावली. दादरच्या सांस्कृतिक परंपरेला शोभेल असा हा रंगतदार नाट्यमहोत्सव यंदाही यशस्वीरित्या पार पडला. अंतिम फेरीत सादर झालेल्या उत्कृष्ठ नाट्यसादरीकरणांनी उपस्थितांवर एक अविस्मरणीय ठसा उमटवला.

सर्वोत्कृष्ट लेखक : प्रतीक चौधरी (मढं निघालंय अनुदानाला)
दिग्दर्शन : महेश कापरेकर व सागर चव्हाण (मढं निघालंय अनुदानाला)
नेपथ्य/प्रकाशयोजना : सिद्धेश नांदस्कर (थिम्मक्का)
संगीत : सुबेध माकंडकर व चिन्मय सावंत.
रंगभूषा : तेजश्री पिलनकर.
वेशभूषा : मैथिली मोडे व प्रिया ढगे (पाकिस्तानचं यान)

## म्हाडाकडून ४०२ घरांची लॉटरी
### १४ ते ३६ लाखांच्या सदनिकांसाठी अर्ज प्रक्रिया सुरू

**नाशिक : रयत समाचार**

म्हाडाच्या नाशिक गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळातर्फे नाशिक शहरातील चुंचाळे, पाथर्डी, मखमलाबाद, आडगाव आणि सातपूर शिवारातील विविध गृहनिर्माण प्रकल्पांमधील ४०२ सदनिकांच्या विक्रीसाठी ऑनलाइन लॉटरी प्रक्रियेची सुरुवात करण्यात आली. आगाऊ अंशदान तत्वावर होणाऱ्या या सोडतीची नोंदणी 'गो लाईव्ह' कार्यक्रमात म्हाडाचे उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांच्या हस्ते सुरू झाली. जयस्वाल यांनी सांगितले की, वर्ष २०२५ मध्ये यापूर्वी तीन सोडतीतून ८४६ घरांची उपलब्धता करून दिल्यानंतर ही चौथी लॉटरी जाहीर करण्यात आली आहे. "परवडणारी घरे सर्वसामान्यांना उपलब्ध करून देण्याचा मंडळाचा प्रयत्न सुरू असून या योजनेतील घरांच्या किंमती १४.९४ लाखांपासून ३६.७५ लाखांपर्यंत आहेत," अशी माहिती त्यांनी दिली. सोडतीत निवड झाल्यानंतर घराची रक्कम पाच टप्प्यांत भरण्याची सुविधा देण्यात आली आहे. नाशिक मंडळाने जाहीर केलेल्या सोडतीत अल्प उत्पन्न गटासाठी चुंचाळे शिवारात १३८, पाथर्डी ३०, मखमलाबाद ४८ आणि आडगाव ७७ अशा मिळून २९३ सदनिका उपलब्ध आहेत. मध्यम उत्पन्न गटासाठी सातपूरमध्ये ४०, पाथर्डीत ३५ आणि आडगावात ३४ अशा मिळून १०९ सदनिकांचा समावेश आहे.

इच्छुक अर्जदारांना https://housing.mhada.gov.in किंवा https://mhada.gov.in या संकेतस्थळावरून अर्ज करता येणार असून २३ डिसेंबर २०२५, रात्री ११.५९ पर्यंत ऑनलाइन नोंदणी व अनामत रकमेचा भरणा करता येईल. /द्वारे अनामत भरण्याची शेवटची मुदत २४ डिसेंबर २०२५ अशी आहे. सोडतीसाठी स्वीकृत अर्जांची प्रारूप यादी ३० डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजता प्रसिद्ध होणार आहे. यानंतर ३० डिसेंबर ते २ जानेवारी २०२६ या कालावधीत ऑनलाइन दावे-हरकती नोंदवता येतील. दावे-हरकतींची छाननी झाल्यानंतर ६ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता अंतिम यादी जाहीर करण्यात येणार आहे. सोडतीचा दिनांक व स्थळ पुढील काही दिवसांत संकेतस्थळावर स्वतंत्रपणे जाहीर केले जाईल. अर्ज करताना अर्जदारांना १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीतील उत्पन्नाचा पुरावा आयकर विवरणपत्र किंवा तहसीलदारांकडील उत्पन्न प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. सोडतीशी संबंधित अटी, पात्रता, आरक्षण आणि प्रक्रिया यांची माहिती पुस्तिका संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.



# चुकीच्या घरपट्टी नोटिसा मागे घ्या

## अविनाश घुले यांचा आंदोलनाचा इशारा

**अहमदनगर । रयत समाचार**

शहरातील नागरिकांना मनपा प्रशासनाने पाठवलेल्या नव्या घरपट्टीच्या नोटिसांमुळे मोठा गोंधळ निर्माण झाला असून अनेकांना चुकीच्या आकारणीचा आर्थिक फटका बसत आहे. प्रभाग क्रमांक १३ सह शहरातील विविध भागांत अचूक मोजणी न करता तयार करण्यात आलेल्या बिलांविरोधात नागरिकांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर मनपाने जाहीर केलेल्या चुकीच्या नोटिसा त्वरित मागे घ्याव्यात, अशी ठाम मागणी माजी स्थायी समिती सभापती अविनाश घुले



व नगरसेवक विपुल शेटीया यांनी केली. नवीन दरांनुसार करण्यात आलेल्या घरपट्टी आकारणीत प्रशासकीय दुर्लक्ष स्पष्टपणे दिसून येत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. अनेक घरांची मोजणी चुकीच्या पद्धतीने झाली असून स्वतःच्या राहत्या घराला भाडेतत्त्वावरील घर म्हणून नोंदविण्याची प्रकरणेही समोर आली आहेत. त्यामुळे वाढलेल्या आर्थिक भारामुळे नागरिक प्रशासनाकडे दाद मागत असून तत्काळ दुरुस्तीची मागणी करत आहेत. माजी स्थायी समिती सभापती अविनाश घुले यांनी घरपट्टी आकारणीत झालेल्या त्रुटींवर सविस्तर अहवाल तयार करून संबंधित विभागाकडे हरकती नोंदवल्या आहेत. नगरसेवक विपुल शेटीया यांनी प्रभाग १३ तसेच शहरातील इतर भागांतील तक्रारींचा आढावा घेत असताना मोजणीतील त्रुटी अत्यंत गंभीर असल्याचे सांगितले. ''नागरिकांची वास्तविक घरपट्टी तेवढीच आकारली जावी. सध्याच्या पद्धतीने आलेली बिले अन्यायकारक असून ती मान्य करता येणार नाहीत. प्रशासनाने योग्य तो मार्ग काढला नाही, तर आम्ही नागरिकांसह मनपा मुख्यालयावर तीव्र आंदोलन छेडू,'' असा इशारा त्यांनी दिला. घरपट्टी आकारणीतील विसंगती फक्त निवासी घरांपुरती मर्यादित नसून मार्केट यार्ड परिसरातील व्यापाऱ्यांनाही चुकीची आकारणी करण्यात आली आहे. व्यापारी वर्गातूनही मोठ्या प्रमाणात असंतोष व्यक्त होत आहे. सर्व तक्रारी संकलित करून लवकरच आयुक्तांची भेट घेण्यात येणार असून नागरिक व व्यापाऱ्यांना योग्य न्याय मिळेपर्यंत संघर्ष सुरू राहील, अशी भूमिका घुले आणि शेटीया यांनी मांडली. नागरिकांनीही आपल्या हरकती वेळेत नोंदवाव्यात, असे आवाहन घुले आणि शेटीया यांनी केले आहे.

> ''चुकीच्या आकारणीमुळे नागरिकांना अनावश्यक त्रास सहन करावा लागतोय. प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन चुकीच्या नोटिसा मागे घ्याव्यात; अन्यथा आम्हाला कठोर भूमिका घ्यावी लागेल,'' असा इशारा अविनाश घुले यांनी दिला.

# कचरावेचक पाल्यांच्या शिष्यवृत्तीस अडसर

## कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायतची तक्रार

**अहमदनगर । रयत समाचार**

कचरा वेचक कुटुंबातील विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या संयुक्त मेट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना प्रस्तावांच्या प्रक्रियेत होत असलेल्या विलंबाबाबत कागद काच पत्रा कष्टकरी पंचायतकडून समाज कल्याण मंत्री संजय शिरसाट आणि समाज कल्याण निरीक्षक यांच्याकडे तक्रार नोंदविण्यात आली आहे. संघटनेचे जिल्हाध्यक्ष विकास उडाणशिवे यांनी या गंभीर प्रश्नाकडे विभागाचे लक्ष वेधले.

शहरात सुका कचरा संकलनावर उदरनिर्वाह करणारा मोठा समाजवर्ग असून तुटपुंज्या उत्पन्नामुळे या कुटुंबातील मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे निरक्षरतेचे प्रमाण वाढू नये म्हणून राज्य व केंद्र सरकारने संयुक्तपणे सुरू केलेल्या मेट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजनेत कचरा वेचकांच्या पाल्यांचा समावेश करण्यात आला आहे. या उपक्रमामुळे हजारो कुटुंबांना शैक्षणिक दिलासा मिळत आहे.

तथापि, काही तांत्रिक कागदपत्रांच्या अटींमुळे अहिल्यानगरमधील अनेक पात्र विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ अद्याप मिळालेला नाही. हा प्रश्न गांभीर्याने ओळखून कागद काच पत्रा कष्टकरी पंचायतने विद्यार्थ्यांची संपूर्ण माहिती, वर्गनिहाय तपशील आणि कचरा वेचक असल्याची प्रमाणपत्रे जोडून शिष्यवृत्ती प्रस्तावांची पूर्तता केली. ता. २२ एप्रिल २०२५ रोजी हा प्रस्ताव सीताराम सारडा विद्यालयाला सुपूर्दही करण्यात आला.

सर्व आवश्यक माहिती उपलब्ध करूनही शाळेकडून शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात होत असलेला विलंब चिंताजनक असल्याचे पंचायतने निवेदनात नमूद केले आहे. प्रस्ताव वेळेत शासनाकडे पोहोचला नाही, तर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणार नाही आणि त्यास शाळा प्रशासनच जबाबदार राहील, असा इशाराही पंचायतने दिला आहे.

शाळेला तातडीने प्रस्ताव शासनाकडे दाखल करण्याचे निर्देश द्यावेत, तसेच शिष्यवृत्ती न मिळाल्यास विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान शाळा प्रशासनाकडून वसूल करावे, अशी मागणी कागद काच पत्रा कष्टकरी पंचायततर्फे समाज कल्याण विभागाकडे करण्यात आली आहे.

# मकर वीलक्कु उत्सवास भाविकांची मोठी उपस्थिती

**अहमदनगर । रयत समाचार**

सावेडी येथील श्री अय्यप्पा मंदिरात मकर वीलक्कु उत्सवाच्या ५९ दिवसांत रोज महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून शेकडो भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतल्याची माहिती सचिव वसंत सिंग यांनी दिली. ता. १७ नोव्हेंबर २०२५ रोजी सुरू झालेल्या उत्सवाची सांगता ता. १४ जानेवारी २०२६ रोजी मकर वीलक्कु उत्सवाने होणार आहे. केरळमधील प्रसिद्ध शबरीमाला मंदिराच्या धर्तीवर नगरमध्ये हा उत्सव दरवर्षी साजरा केला जातो. यामध्ये दररोज अनेक भाविकांकडून अन्नदान करण्यात येते. कालचा महाप्रसाद महेश गोपालकृष्णन व त्यांच्या परिवाराच्या वतीने देण्यात आला.

मंदिर चारही बाजूंनी ओवऱ्यांनी वेढलेले असून मध्यभागी अय्यप्पा स्वामींचे मुख्य मंदिर आहे. एका बाजूला गणपती व दुसऱ्या बाजूला सरस्वतीचे मंदिर असून तिन्ही मंदिरांतील मूर्त्या अत्यंत प्रसन्न आहेत. परिसरात स्वतंत्र



स्वयंपाक गृह, महाप्रसादासाठी हॉल, आणि जेवणासाठी स्टीलच्या खुर्च्याटेबलांची सोय उपलब्ध आहे. तसेच मोकळ्या जागेत बुफे पद्धतीनेही जेवण देण्यात येते. दर शनिवारी व रविवारी भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. विशेष म्हणजे, दर शनिवारी महाप्रसाद वर्षभर चालतो. अनेक भक्त अन्नदान व महाप्रसादासाठी मदत करीत असतात. अधिक माहितीसाठी रेणावीकर नगर येथील अय्यप्पा सेवा समितीशी मंदिरात संपर्क साधावा, असे आवाहन अध्यक्ष बाबुशेठ टायरवाले, सचिव वसंत सिंग, उपाध्यक्ष राजू लक्ष्मण, सेक्रेटरी के. उदयकुमार, खजिनदार पी. सत्यान नायर व समिती सदस्यांनी केले.

# आंतरराष्ट्रीय संगीत परीक्षेत ग्रेस म्युझिक अकॅडमीचे यश

**अहमदनगर । आबीद खान**

लंडन येथील ट्रीनिटी कॉलेजच्या वतीने घेण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय संगीत परीक्षेत ग्रेस म्युझिक अकॅडमी, अहिल्यानगरच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय व प्रशंसनीय यश संपादन केले आहे.

या परीक्षेत इलेक्ट्रॉनिक की-बोर्ड ग्रेड प्रॅक्टिकलमध्ये अशिता लोखंडे (९३/१००) व ॲरन पंडीत (८४/१००), तर ग्रेड प्रॅक्टिकलमध्ये ओजस राऊत (८७/१००) उत्तीर्ण झाला. ग्रेड थेअरी ऑफ म्युझिकमध्ये अभिषेक पोळ (९८/१००), इशा बडवे (९७/१००), ॲरन पंडीत (९६/१००), अँजेलो थोरात (९६/१००), ओंकार राऊत (९६/१००), ओजस राऊत




(९४/१००), शलमोन पहिलवान (८७/१००) आणि अशिता लोखंडे (८४/१००) यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.

इलेक्ट्रॉनिक की-बोर्ड ग्रेडमध्ये दक्ष कुलकर्णी (१००/१००), केवीन सोनावणे (८९/१००), अभिषेक पोळ (८९/१००), नोएल पंडीत (८७/१००), प्रज्ञेश कुलश्रेष्ठ (८७/१००) आणि शलमोन पहिलवान (८२/१००) उत्तीर्ण झाले. इलेक्ट्रॉनिक की-बोर्ड इनिशियल ग्रेडमध्ये श्वेता कुलकर्णी (९१/१००), राजवीर घुले (९१/१००), राजवीर थोरात (८७/१००), रेवती पिसुटे (८४/१००), गिदोन देठे (८४/१००) व जेसन ओहोळ (८२/१००) यांनी गुणवत्तापूर्वक यश मिळवले.

ग्रेस फाउंडेशन अंतर्गत ग्रेस म्युझिक अकॅडमीच्या वार्षिक म्युझिकल उत्सवाचे आयोजन शनिवार, ता. ६ डिसेंबर २०२५ रोजी संध्याकाळी ६.०० वा. माऊली सभागृह, झोपडी कॅन्टीन, सावेडी येथे करण्यात आले असल्याची माहिती डायरेक्टर पिटर पंडित सर यांनी दिली.

या उत्सवाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉन बॉस्को विद्यालयाचे मुख्याध्यापक फादर अजित मुनीस, संत आन्ना चर्चचे पॅरिश प्रिस्ट फादर मॅकॅनरो लोपीस, हारमोनी इंटरनॅशनल स्कूलचे मुख्याध्यापक अशोक बेरड व ग्रेस फाउंडेशनचे सेक्रेटरी लिओ पंडीत उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात ग्रेस म्युझिक अकॅडमीचे विद्यार्थी हिंदी, मराठी व इंग्रजी भाषेतील नवीनजुनी गीते सादर करणार आहेत. कार्यक्रमासाठी प्रवेश विनामूल्य असून लकी ड्रॉतून महिला प्रेक्षकांसाठी तीन आकर्षक सोन्याच्या नथणी तसेच इतर आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहेत. संगीतप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घ्यावा, असे आवाहन सोनाली पिटर पंडीत मॅडम यांनी केले आहे.

दैनिक रयत समाचारचा ख्रिसमस विशेषांक
गुरूवार, ता.२५ डिसेंबर रोजी प्रसिद्ध होत आहे
ख्रिसमस विशेषांक
अंकासाठी लेख, माहिती, जाहीराती पाठवाव्यात
- अतिथी संपादक -
सॅम्युअल वाघमारे
रयत समाचार महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक
लेख, माहिती व जाहीरात पाठविण्यासाठी संपर्क क्रमांक
भैरवनाथ- ८८०५४०१८००, दिपक- ७७७४००१८००,
तुषार- ७९७२३४४४७४, पंकज-९८२२४९६६६४

# विचारवंत गोविंद पानसरे यांच्या स्मरणार्थ पुस्तकासाठी

## आठवणी पाठविण्याचे स्मिता पानसरे यांचे आवाहन

**कोल्हापूर । रयत समाचार**

विचारस्वातंत्र्य, तर्कनिष्ठ समाज आणि मानवी मूल्यांसाठी आयुष्यभर लढा देणारे ज्येष्ठ डाव्या विचारसरणीचे नेते, लेखक, बुद्धिवादी कार्यकर्ते आणि भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे प्रभावी मार्गदर्शक गोविंद पानसरे यांच्या स्मरणार्थ त्यांच्या कन्या स्मिता गोविंद पानसरे यांनी सर्व सहकाऱ्यांना, मित्रपरिवाराला आणि समाजातील विचारप्रेमींना महत्त्वाचे आवाहन केले आहे. स्मिता पानसरे म्हणाल्या, माझे बाबा फक्त पक्षाचे कार्यकर्ते नव्हते ते विचारांचे योद्धे, शिक्षक, लेखक आणि लोकशाही समानतेचे निष्ठावान पुरस्कर्ते होते. त्यांचा खून हा केवळ व्यक्तीचा अंत नव्हता, तो विचारांवरचा गंभीर हल्ला होता. त्यांच्या आठवणी, त्यांचे विचार आणि लढाऊ परंपरा आपण जिवापाड जपतो आहोत त्यापुढे म्हणाल्या, त्यांच्या बाबांच्या स्मरणार्थ एक पुस्तक तयार करण्याचा मानस असून या पुस्तकात त्यांच्याबद्दलची आठवणींची संपत्ती जतन केली जाणार आहे. पानसरे यांच्याशी संबंधित आठवणी, प्रसंग, भाषण, प्रेरणादायक वाक्ये, पत्रव्यवहार, चर्चा संवाद यापैकी कोणतेही लिखित स्वरूपातील अनुभव पाठवावेत, अशी विनंती स्मिता पानसरे यांनी केली आहे. लिहिणे कठीण वाटत असल्यास लहानसा ऑडिओ किंवा व्हिडिओ स्वरूपातील संदेशही स्वीकारला जाईल. हे पुस्तक, पानसरे यांच्या संघर्षाचे, धैर्याचे आणि विचारविश्वाचे जिवंत स्मारक ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. इच्छुकांनी डिसेंबर २०२५ च्या अखेरपर्यंत आपले लिखाण अथवा ऑडिओ/व्हिडिओ आजी साहित्य स्मिता गोविंद पानसरे - ९०७५७७१९१२ या क्रमांकावर पाठवावे.



# गोंदवले पायी दिंडीची उत्साहात सांगता



**अहमदनगर । विजय मते**

सावेडी उपनगरातील शिलाविहार येथील श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज मंदिरापासून सुरू झालेल्या नगरगोंदवले पायी दिंडीची नवव्या दिवशी श्रीक्षेत्र गोंदवले येथे भक्तिमय वातावरणात उत्साहात सांगता झाली.

यंदा दिंडीचे २५ वे रोप्यमहोत्सवी वर्ष असून, या विशेष वर्षानिमित्त मोठ्या संख्येने भाविक सहभागी झाले होते. अखंड 'श्रीराम जय राम जय जय राम' या नामस्मरणासह दिंडीने आठ दिवसांत विविध ठिकाणी मार्गक्रमण केले. मार्गातील गावांमध्ये भाविकांनी दिंडीचे स्वागत करत मान्यवरांच्या हस्ते पालखीची पूजा करण्यात आली. वारकऱ्यांसाठी भोजन व्यवस्थाही उत्तमरित्या करण्यात आली होती. दिंडी मोक्षदा एकादशी व गीता जयंती या पवित्र दिवशी श्रीक्षेत्र गोंदवले येथे पोहोचली. आगमनानंतर फटाक्यांची आतषबाजी करून पालखीचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर धाकटे श्रीराम व मोठे श्रीराम मंदिरास प्रदक्षिणा घालून पालखी समाधी मंदिरात नेण्यात आली. पादुकांचे दर्शन घेत मंदिर प्रदक्षिणेनंतर दिंडीची सांगता झाली. कार्यक्रमाची सांगता झाल्यावर दिंडी चालक हभप रेखाताई रिंगणे यांनी सर्व वारकरी, भाविक, मान्यवर आणि आयोजनात सहकार्य करणाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात
छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद
खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टींग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

दैनिक रयत समाचार
अहमदनगर जिल्हा आवृत्तीसाठी...
त्वरित नियुक्त करणे आहेत
१४ तालुका प्रतिनिधी, १४ शहर प्रतिनिधी, १५ प्रेस फोटोग्राफर, १४ तालुक्यात किमान ५ ते ७ ग्रामीण वार्ताहर.
अनुभवींना प्राधान्य!
इच्छुकांनी जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर सात दिवसाच्या आत मानधनाच्या अपेक्षेसह मा. संपादक यांच्या नावे अर्ज करावा अर्ज या क्रमांकावर व्हॉटसअप करावा : 8805401800
आम्ही काय देणार
* पत्रकार म्हणून निवड झाल्यानंतर नियुक्तीपत्र, (Appointment letter) दैनिकाचे ओळखपत्र (PRESS I. Card)
एकाच वेळी प्रिंट व डिजिटल मिडियात काम करण्याची संधी.

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

# नगरपालिका निवडणुक उत्साहात; उशिरा लक्ष्मीदर्शनामुळे रात्रीपर्यंत रांगा

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

नऊ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर झालेल्या श्रीरामपूर नगरपालिकेच्या निवडणुकीत मतदान उत्साहात पार पडले. मात्र मतमोजणी २१ डिसेंबरला होणार असल्याने निकाल जाहीर होण्यात होणाऱ्या विलंबाबद्दल अनेक मतदार, उमेदवार व कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली. सकाळी साडेसातला मतदानास सुरुवात झाली. थंडीमुळे सुरुवातीला मतदार बाहेर पडले नाहीत, त्यामुळे सकाळी अकरापर्यंत फक्त १५ टक्के मतदान झाले होते. दुपारनंतर प्रमाण वाढू लागले. सायंकाळी साडेपाचपर्यंत मतदानाचा टक्का सुमारे ५५ झाला होता. मात्र अनेक मतदान केंद्रांवर मोठ्या रांगा असल्याने रात्री उशिरापर्यंत मतदान सुरू राहिले. प्रशासनाने हे गृहीत धरून प्रत्येक ठिकाणी पुरेशी वीज व आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या.



अनेक मतदान केंद्रांवर मतदार यादीतील अनुक्रमांकात मोठा गोंधळ निर्माण झाला. प्रत्येक मतदान केंद्रात यादी क्रमांकापासून पुन्हा एकापासून सुरुवात केल्याने मतदारांना आपला नंबर शोधण्यासाठी प्रभागातील अनेक केंद्रांत जावे लागले. त्यामुळे मतदान अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मतदारांच्या रोषाला सामोरे जावे लागले. घरपोच मतदान चिठ्ठ्या अनेक भागात वेळेत मिळाल्या नाहीत. काही बीएलओंची नियुक्ती दोन ठिकाणी केल्याचे प्रकार समोर आले. काहींवर कामाचा ताण, तर काहींना आराम असा विस्कळीत कारभारही निदर्शनास आला.

प्रभाग ५, ६, ७, ८ तसेच मिल्लतनगर, संजयनगर परिसरात दुपारनंतर मतदारांचा मोठा ओघ वाढला. डीडी काचोळे विद्यालयातील प्रभाग १४ आणि १६ च्या केंद्रांवर दुपारी साडेतीनला मोठी गर्दी झाली. मतदार मतदान करून मैदानात थांबत असल्याने पोलिसांनी ध्वनीक्षेपकावरून विनंती करून परिसर मोकळा करवला.

नवीन मराठी शाळेत प्रभाग १२ च्या दोन महिला उमेदवारांच्या समर्थकांत शाब्दिक चकमक झाली. पोलिस कुमक मागवून जमाव पांगवण्यात आला. भीरा खटोड कन्या विद्यालयात व्हीलचेअरची सुविधा नसल्याने अपंग मतदारांना त्रास झाला. प्रभाग ७ च्या केंद्राजवळ बाचाबाची झाल्याने पोलिसांना हस्तक्षेप करावा लागला. पाटणी विद्यालयाजवळ पोलिस निरीक्षक महेश पाटील यांनी रस्त्यावर उभ्या असलेल्या नागरिकांना लाठीचार्ज केल्याची चर्चा असून त्यामुळे काही मतदार नाराज झाले.

८० टक्क्यांपेक्षा अधिक मतदानाची अपेक्षा होती. परंतु मतदार यादीतील मृत, दुबार व बाहेरगावी असलेल्या मतदारांची संख्या जास्त असल्यामुळे एकूण टक्केवारी कमी झाल्याची चर्चा शहरात सुरू आहे.

पटेल हायस्कूलमधील एका मतदान केंद्रावर गुलाबी रंगाच्या ‘सखी मतदान केंद्रा’ची व्यवस्था करण्यात आली होती. केंद्रातील सर्व कर्मचारी महिला असून गुलाबी पोशाख परिधान करून त्यांनी मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडली.

निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी किरण सावंत पाटील, सहाय्यक निवडणूक अधिकारी तहसीलदार मिलिंद वाघ आणि मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली १३५ कॅमेऱ्यांच्या देखरेखीखाली सर्व ८९ मतदान केंद्रांचे निरीक्षण करण्यात आले. तक्रार प्राप्त होताच संबंधित ठिकाणी तातडीने कारवाई करण्यात येत होती. किरकोळ घटनांशिवाय मतदानाची प्रक्रिया शांततेत पार पडली.

### चर्चा २०० ते ४००० चीच !

नगरपालिकेच्या या निवडणुकीसाठी प्रत्येक उमेदवाराने आपल्या कुवतीनुसार मतदारांना प्रसाद वाटप केले. काही अपक्षांनी २००, ४०० व ५०० प्रसादरूपाने दिले. तर मोठ्या पक्षाच्या उमेदवारांनी एक हजार, पंधराशे, दोन हजार दिले. एका राष्ट्रीय पक्षाच्या उमेदवाराने मात्र थेट चार हजार रुपये रोख देऊन व टोकन रूपानेसुद्धा अजून काही प्रसाद देऊ केल्याची चर्चा त्या प्रभागात होती. मतदार हे उमेदवारांपेक्षा हुशार निघाले. सर्व उमेदवारांचा प्रसाद मिळाल्याशिवाय ते मतदानाला बाहेरच पडले नाही त्यामुळे खूप उशीर झाला आणि दुपारनंतर मात्र मतदान केंद्रावर मोठ मोठ्या रांगा लागल्या.

# विखे पिता-पुत्र श्रीरामपुरमधून लढणार असल्याच्या चर्चेला उधाण

## आरक्षणासंदर्भात नि:संदिग्धता;शिर्डीला आरक्षण?

**श्रीरामपूर । शफीक बागवान**



पालकमंत्री राधाकृष्ण विखे अथवा डॉ. सुजय विखे हे आगामी निवडणूक श्रीरामपुर मधून लढणार असल्याच्या चर्चेला सर्वत्र उधान आले आहे. कार्यकर्ते, नेते आणि पुढारी ही चर्चा करताना दिसत असून ही वार्ता किती खरी या संदर्भात राधाकृष्ण विखे सुजय विखे यांच्या खुलाशाची आणि आयोगाच्या आदेशाची सर्वांना वाट पाहावी लागणार आहे

शिर्डी लोकसभा आणि श्रीरामपूर विधानसभा सद्यस्थितीत आरक्षण आहे. सदरील आरक्षण हे अजून एक पंचवार्षिक असू शकते, असा काही जाणकारांचा अंदाज आहे. तर आगामी लोकसभा आणि विधानसभा ही सर्वसाधारण जागेसाठी यंदा खुली होणार असल्याची चर्चा काही राजकीय विश्लेषक करीत आहेत. श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व सध्या आमदार हेमंत ओगले करीत आहेत. यापूर्वी माजी आमदार भाऊसाहेब कांबळे यांनी दहा तर एक पंचवार्षिक टर्म माजी आमदार लहू कानडे यांनी पूर्ण केली आहे. ओगले हे आरक्षण पडल्यानंतरचे चौथे आमदार आहेत. कर्जत जामखेड विधानसभेचे यापूर्वी अशाच प्रकारचे आरक्षण हे २५ वर्षां पर्यंत होते. शिर्डी लोकसभा मतदार संघाचे सदाशिव लोखंडे, भाऊसाहेब वाकचौरे यांनी यापूर्वी नेतृत्व केले आहे. सध्या भाऊसाहेब वाकचौरे खासदार आहेत. हे दोन्हीही आरक्षण नेमके किती वर्षाचे आहेत, याबाबत वेगवेगळ्या चर्चा आणि अंदाज बांधले जात आहेत. सद्यस्थितीत नगरपालिका, नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या निवडणुकीचा हंगाम सुरू आहे. राधाकृष्ण विखे, डॉ. सुजय विखे यांनी श्रीरामपूर शहराकडे विशेष लक्ष केंद्रित केले आहे. नगरपालिकेच्या निवडणुकीत त्यांनी हिरीरीने भाग घेतला. राजकारणात प्रवेश केल्या नंतर सुजय विखे हे पहिल्यांदाच मुस्लिम बहुल वार्ड नंबर दोन मधील भागात आले. तर राधाकृष्ण विखे यांनीही अनेक वर्षानंतर या भागात हजेरी लावली. यावरून शिर्डी लोकसभा आणि श्रीरामपूर विधानसभेसाठी आरक्षण उठलेच तर राधाकृष्ण विखे सुजय विखे हे लोकसभा आणि विधानसभेसाठी फील्डिंग लावत असल्याची ही चर्चा मतदारांमध्ये आहे.यात किती सत्यता असेल त्यासाठी काही काळ आणि अवधी जाऊ द्यावा लागणार आहे. शिवाय निवडणूक आयोगाच्या आदेशाची देखील गरज भासणार आहे.

शिर्डी लोकसभा आणि श्रीरामपूर विधानसभेचे आरक्षण उठलेच तर विखे पिता पुत्रांसह इतरही असंख्य इच्छुक येथे लढतील.

# नागपूर अधिवेशनात शिव पाणंद शेतरस्ता जनजागरण व पेरू वाटप

## एक वर्षात हद्दनिश्चिती, मजबुतीकरणाची मागणी

**अहमदनगर । रयत समाचार**

राज्यातील हजारो शेतकऱ्यांच्या जीवन-मरणाचा प्रश्न ठरत चाललेल्या शेतरस्त्यांच्या समस्येकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शिव पाणंद शेतरस्ता चळवळ येत्या ९ डिसेंबर रोजी नागपूर हिवाळी अधिवेशनादरम्यान भव्य जनजागरण व पेरू वाटप अभियान राबवणार आहे. शेतरस्ते बंद असणे, अडथळ्यांमुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण खंडित होणे, शेतमालाचे नुकसान, तसेच गंभीर स्वरूपाच्या घटनांमुळे निर्माण झालेली परिस्थिती याकडे शासनाचे लक्ष वेधणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

अधिवेशनात राज्यातील सर्व आमदार व मंत्र्यांना ‘शेत तिथे रस्तागाव तिथे समृद्धी’ या संदेशाची टोपी तसेच पेरू वाटप करून शेतरस्ता प्रश्नाची तातडी अधोरेखित केली जाणार आहे. यावेळी शासन निर्णयांची पारदर्शक आणि प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणी करण्यात येणार आहे.

शिव पाणंद शेतरस्ता चळवळीच्या प्रमुख मागण्या: राज्यातील सर्व शिवरस्त्यांची एक वर्षाच्या आत हद्दनिश्चिती/सिमांकन करून मजबुतीकरण करावे. शासन निर्णयांचे पालन न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी. दीर्घकालीन शेतरस्ता उभारणीसाठी स्वतंत्र मंत्रालय किंवा शिव पाणंद शेतरस्ता समग्र बळकटीकरण योजना नागपूर अधिवेशनात मंजूर करावी. तहसीलदारांनी दिलेल्या आदेशांचे पालन उपविभागीय अधिकारी व जिल्हाधिकारी यांनी सुनिश्चित करावे; उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी. अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

## मतदान शांततेत

# ९१ उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत



**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्रीगोंदा नगर परिषद निवडणुकीसाठीचे मतदान काल ता. २ डिसेंबर २०२५ शांततेच्या वातावरणात पार पडले. दुपारनंतर बहुतेक मतदान केंद्रांवर मतदारांच्या मोठ्या रांगा दिसल्या. नगराध्यक्षपदासाठी चार उमेदवार तर नगरसेवक पदासाठी ९१ उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद झाले. निकाल २१ डिसेंबर रोजी जाहीर होणार असून सर्वच पक्षांनी आपल्या पॅनलच्या विजयाचा दावा केला आहे.

मतदान संपल्यानंतर आमदार विक्रम पाचपुते यांच्या माऊली निवासस्थानी फटाक्यांची आतषबाजी व गुलालाची उधळण करत “२३ पैकी २३ उमेदवार तसेच २० डिसेंबरला होणाऱ्या प्रभाग ७ ‘ब’ मधील उमेदवारही विजयी होतील,” असा दावा आमदार पाचपुते यांनी केला.

तर शेख महंमद महाराज दूध संकलन केंद्र येथे माजी उपनगराध्यक्ष मनोहर पोटे यांनी फटाके फोडत, “आमचाच पॅनल विजयी होईल,” असा आत्मविश्वास व्यक्त केला. दोन्ही बाजूंनी दावे-प्रतिदावे होत असून अंतिम निकालानंतरच कोणता पॅनल पुढे येतो हे स्पष्ट होणार आहे.

मतदारांनी संपर्क साधला असता मिश्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या. सुरुवातीला चौरंगी वाटणारी लढत अखेरीस दुरंगी बनल्याचे चित्र दिसून आले असून अंतिम टप्प्यात भाजप आणि शिवसेना यांच्यात अटीतटीचा सामना होईल, असे संकेत मतदारांनी दिले.



सलग दुसऱ्या वर्षी ब्रास बँड स्पर्धेत अव्वल

# संजीवनी सैनिकी स्कूल राज्यात प्रथम

**कोपरगाव । किसन पवार**

पुणे येथे भारत सरकार शिक्षण मंत्रालय आणि राज्य शैक्षणिक संशोधन परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय ब्रास बँड स्पर्धा २०२५२६ मध्ये संजीवनी सैनिकी स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, कोपरगाव यांनी सलग दुसऱ्या वर्षी प्रथम क्रमांकाचे यश मिळवले. राज्यातील एकूण ३७ संघांमधून सात संघ अंतिम फेरीत निवडले गेले होते. इयत्ता दहावीतील कॅडेट विपुल दिपक वाघ यांच्या नेतृत्वाखाली संजीवनीच्या ३७ कॅडेट्सच्या पथकाने शिस्तबद्ध, शास्त्रशुद्ध आणि उत्कृष्ट सादरीकरण करत परीक्षकांची मने जिंकली. या विजयानंतर संजीवनीचे पथक आता पश्चिम विभागीय राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहे. या स्पर्धेत महाराष्ट्रासह गुजरात, गोवा, मध्य प्रदेश, राजस्थान, दादरा-नगर हवेली आणि दीव-दमण राज्यांमधील पथके सहभागी होणार आहेत. संस्थेचे अध्यक्ष नितीन कोल्हे, मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे व विश्वस्त सुमित कोल्हे यांनी सहभागी विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन करून आगामी राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# शिक्षण वाचवा, शिक्षक वाचवा, भविष्य वाचवा- पाडेकर

## ५ डिसेंबर ‘शाळा बंद’ आंदोलनाला शिक्षकांचा उत्स्फूर्त पाठिंबा

**अकोले । रयत समाचार**

५ डिसेंबर रोजीच्या राज्यव्यापी ‘शाळा बंद’ आंदोलनाला अकोले तालुक्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांकडून अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला आहे. अकोले तालुका शिक्षक समन्वय समितीची महत्त्वपूर्ण बैठक उत्स्फूर्त वातावरणात पार पडली. या बैठकीत आंदोलन शिस्तबद्ध, शांततेत व प्रभावीपणे पार पाडण्याचा एकमुखी ठराव मंजूर करण्यात आला शिक्षक भारती पुणे विभागाचे कार्याध्यक्ष महेश पाडेकर यांनी आंदोलनाचे नेतृत्व स्वीकारत शिक्षक आणि विद्यार्थ्यांवर परिणाम करणाऱ्या



शासन निर्णयांचे परिणाम उपस्थितांसमोर स्पष्ट केले.

१५ मार्च २०२४ रोजी जाहीर झालेल्या “शिक्षक संचमान्यता व पुनर्रचना” निर्णयाविरोधात शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. विद्यार्थीसंख्येच्या निकषांमुळे अनेक शिक्षक “अतिरिक्त” ठरण्याची शक्यता असून ग्रामीण, आदिवासी व दुर्गम भागातील शाळांवर याचा गंभीर परिणाम होणार असल्याचा इशारा समितीने दिला. अनेक शाळांच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण होण्याची भीतीही बैठकीत व्यक्त करण्यात आली.

या निर्णयामुळे अनुदानित शिक्षण हळूहळू संपवण्याचा मार्ग मोकळा होत असल्याचा आरोप समितीने केला. अनुदान कपात झाल्यास शाळांची फी वाढून सर्वसामान्य विद्यार्थ्यांचे शिक्षण महाग होणार असून “शिक्षण सर्वांसाठी” ही संविधानिक संकल्पना धोक्यात येईल, अशी चिंता नोंदविण्यात आली. गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांवरील आर्थिक भार वाढेल, विद्यार्थीशाळा दरी अधिक रुंदावेल, असे मत व्यक्त करण्यात आले.

टीईटी कट ऑफबाबतही शिक्षकांमध्ये रोष दिसून आला. अवाजवी कट ऑफमुळे प्रशिक्षित व पात्र शिक्षकांना नापात्र ठरविणे हा स्पष्ट अन्याय असल्याचे समितीने सांगितले. गुणवत्तेची मोजणी गुणकाट्याच्या आधारे होत नसल्याने टीईटी कट ऑफ तातडीने रद्द करण्याची मागणी बैठकीत जोरदारपणे करण्यात आली. विद्यार्थी संख्या अट ग्रामीण व डोंगरी भागातील शाळांसाठी पूर्ण करणे अशक्य असल्याने ती शिथिल करण्याची मागणी समितीने केली. विद्यार्थी कमी असले तरी अशा भागात शैक्षणिक गरजा अधिक असल्याने शिक्षक कपातीमुळे अनेक शाळांना कुलूप लागण्याचा धोका असल्याचे समितीने स्पष्ट केले. “विद्यार्थी संख्या अट शिथिल करा, शिक्षण वाचवा” असा ठाम पवित्रा बैठकीत घेण्यात आला.

बैठकीत महेश पाडेकर यांनी ज्वलंत भाषण करत उपस्थित शिक्षकांना नवचैतन्य दिले. “हे आंदोलन शिक्षकांचे नाही; हे विद्यार्थ्यांचे, पालकांचे आणि महाराष्ट्राच्या भविष्यासाठीचे आंदोलन आहे. ५ डिसेंबर हा शिक्षण वाचवण्याचा निर्णायक दिवस आहे,” असे आवाहन त्यांनी केले. समितीने समाजातील सर्व घटकांना एकत्र येऊन आंदोलन यशस्वी करण्याचे आवाहन करत शिक्षणाच्या प्रश्नावर एकजुटीने उभे राहण्याचा संदेश दिला.

# बिबट्याच्या हल्ल्यात महिला जखमी

**जामखेड । रिजवान शेख**

बावी गावच्या शिवारात आज सकाळी बिबट्याने एका महिलेवर अचानक हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. या हल्ल्यात उषाबाई सौदागर चव्हाण (वय अंदाजे ५५) गंभीर जखमी झाल्या असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, उषाबाई चव्हाण या सकाळी शेताकडे जात असताना झुडपांमध्ये दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्यांच्यावर झडप घातली. हल्ला इतका अचानक आणि वेगवान होता की त्यांनी आरडाओरड करून मदतीचा आवाज दिला. आवाज ऐकून जवळच काम करणाऱ्या शेतकऱ्यांनी तातडीने धाव घेत बिबट्याच्या तावडीतून त्यांची सुटका केली.



हल्ल्यात उषाबाई यांना डोक्याला, हातांना आणि पायांना खोल जखमा झाल्या असून त्यांना प्रथम जामखेड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारांनंतर पुढील उपचारांसाठी त्यांना अहमदनगर येथील खासगी रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. परिसरात बिबट्याचा शोध सुरू असून नागरिकांना अनावश्यकपणे शिवारात न जाण्याचे आणि सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

गेल्या काही दिवसांपासून बावी परिसरात बिबट्या फिरत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात आल्या होत्या. मात्र आजच्या घटनेनंतर ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शिवारात पिंजरा लावण्याबाबत वनविभागाने प्राथमिक तयारी सुरू केल्याची माहिती समोर येत आहे. वनविभागाने नागरिकांना खबरदारी घेण्याचे, एकट्याने शेतात किंवा ओसाड जागेत न जाण्याचे, तसेच बिबट्याचा कोणताही मागोवा आढळल्यास तात्काळ प्रशासनाशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

या घटनेने जामखेड तालुक्यात वन्यजीवांच्या वाढत्या हालचालीबाबत चिंता व्यक्त होत आहे.

# अजरामर कवयित्री बहिणाबाई चौधरी

मराठी साहित्यातील अजरामर कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचा आज ३ डिसेंबर रोजी ७४ वा स्मृतिदिन. बहिणाबाई चौधरी यांचा जन्म २४ ऑगस्ट १८८० रोजी जळगाव जवळील असोदे या गावी झाला. त्यावेळेच्या परंपरेनुसार वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. दुर्दैवाने तरुणपणीच त्यांना वैधव्य आले. सुरवातीचे एकत्र कुटुंब विभक्त झाल्यावर आणि नवऱ्याच्या निधनानंतर त्यांचे जीवन हलाखीत गेले. पण त्याही परिस्थितीत त्यांनी आपली कन्या काशी आणि पुत्र सोपानदेव व ओंकार यांच्यावर चांगले संस्कार केले. बहिणाबाई या कधीही शाळेत गेल्या नाही. त्यांना लिहिता वाचता येत नव्हते त्यामुळे त्यांनी केलेल्या अनेक कविता काळाच्या ओघात नष्ट झाल्या. त्या निरक्षर होत्या मात्र त्यांना कवितेची निसर्गदत्त देणगी लाभली होती. घरातील आणि शेतातील कामे करता करता त्यांना काव्य सुचले आणि ते काव्य मराठी साहित्य विश्वात अजरामर ठरले. बहिणाबाई शेतात गेल्या की शेतीवर उत्स्फूर्त कविता म्हणत. घरकाम करतानाही त्यांना कविता सुचत. घरकाम करता करता त्या कविता गुणगुणत तसेच जात्यावर दळताना विविध प्रकारच्या ओव्या म्हणत. त्यांनी अशा हजारो कविता केल्या आहेत. मात्र आज त्या सर्व कविता उपलब्ध नाहीत. बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव शाळेत जाऊ लागल्यावर ते बहिणाबाईंच्या कविता आपल्या वहीत लिहून घेऊ लागले. याकामी त्यांना त्यांचे मावसभाऊ पितांबर चौधरी हे मदत करत. बहिणाबाई काम करताना जेव्हा कविता म्हणत तेव्हा सोपानदेव त्या कविता आपल्या वहीत लिहून घेत असत. त्यांचे चिरंजीव सोपानदेव चौधरी हे ही पुढे महाराष्ट्रातील नामवंत कवी म्हणून नावारूपास आले. बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव व मावसभाऊ पितांबर चौधरी यांनी लिहून घेतलेली कविता, गाणी हस्तलिखित स्वरूपात होती. बहिणाबाईंच्या मृत्यूनंतर सोपानदेव यांनी हे हस्तलिखित आचार्य अत्रे यांना दाखवले. आचार्य अत्रे यांनी बहिणाबाईंच्या त्या सर्व कविता वाचल्या आणि उदगारले अहो हे तर बावनकशी सोने आहे! हे महाराष्ट्रापासून लपवून ठेवणे गुन्हा आहे! आचार्य अत्रे यांनी त्या सर्व कविता आपल्याकडे घेतल्या आणि त्या प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला. १९५२ साली आचार्य अत्र्यांनी स्वतः लिहिलेल्या प्रस्तावनेसह बहिणाबाईंच्या ३५ कविता असलेला काव्य संग्रह प्रसिद्ध केला. आचार्य अत्र्यांमुळेच या महान कवीयित्रीचा महाराष्ट्राला परिचय झाला. पुढे बहिणाबाईंच्या अनेक कविता प्रसिद्ध झाल्या. लोकप्रिय झाल्या. संपूर्ण महाराष्ट्राला बहिणाबाईंच्या काव्य प्रतिभेने भुरळ घातली. प्रत्येकाला ती आपली कविता वाटली. बहिणाबाईंच्या सर्व कविता त्यांच्या मातृभाषेत म्हणजे वऱ्हाडी , अहिराणी, खानदेशी भाषेत आहेत. त्यांच्या कवितेचा विषय सासर, माहेर, संसार, शेतीची कामे, निसर्ग, पशुपक्षी, मराठी सण, उत्सव, भाऊ, बहीण, आई, वडील असे होते. या साऱ्यांबद्दल त्यांच्या मनात विलक्षण आत्मीयता होती. हीच आत्मीयता कवितेतून झळकत होती. तल्लख स्मरणशक्ती, सूक्ष्म निरीक्षण, उपजत विनोदबुद्धी, जीवनातील सुख दुःखाकडे समभावाने पाहू शकणारे शहाणपण आणि जगण्यातून कळलेले तत्वज्ञान ही त्यांच्या काव्य प्रतिभेची वैशिष्ट्ये होती. शालेय अभ्यासक्रमात त्यांच्या अनेक कविता समाविष्ट करण्यात आल्या आहेत. अरे संसार संसार जसा तवा चुल्यावर आधी हाताला चटके तेव्हा ( मियते ) मिळते भाकर......, खोप्यामधी खोपा सुगरणीचा चांगला देखा पिलासाठी तिने जीव झाडाले टांगला......, मन वढाय वढाय उभ्या पिकांतलं ढोर किती हाकला हाकला तरी येतं पिकांवर...... धरित्रीले दंडवत..... यासारख्या त्यांच्या कितीतरी कविता शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत. या कविता न अभ्यासलेला एकही व्यक्ती महाराष्ट्रात सापडणार नाही. शाळेत जाणाऱ्या सर्व मुलांच्या या कविता तोंडपाठ आहेत. महाविद्यालयातही त्यांच्या अनेक कविता अभ्यासण्यासाठी आहेत. महाराष्ट्रातील अनेक पिढ्यांनी या कवितांचे पारायण केले आहेत. बहिणाबाईंच्या कवितांनी महाराष्ट्राच्या अनेक पिढ्यांना भुरळ घातली आहेत. महाराष्ट्राच्या साहित्य विश्वात बहिणाबाई चौधरी व त्यांच्या कविता अजरामर आहेत. मराठी साहित्य विश्वातील त्यांचे स्थान ध्रुव ताऱ्यासारखे अढळ आहे; म्हणूनच महाराष्ट्र शासनाने जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे नाव कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ असे ठेवले आहे. जी व्यक्ती कधीही शाळेत गेली नाही त्या व्यक्तीचे नाव विद्यापीठाला दिले जाते यातूनच बहिणाबाईंचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. आपल्या काव्य प्रतिभेने मराठी साहित्याला वेगळ्या उंचीवर नेणाऱ्या या महान कवीयित्रीचे ३ डिसेंबर १९५१ रोजी निधन झाले. आज त्यांचा ७४ वा स्मृतिदिन आहे. स्मृतिदिनी बहिणाबाई चौधरी यांना विनम्र अभिवादन!



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद

# कामगार नेते अरुण बोऱ्हाडे यांना आयफिया पुरस्कार जाहीर

**पिंपरी । प्रदीप गांधलीकर**

साहित्य, इतिहास आणि कामगार चळवळीतील बहुविध कार्यासाठी साहित्यिक व कामगार नेते अरुण तुकाराम बोऱ्हाडे यांना देशपातळीवरील मानाचा आयफिया पुरस्कार जाहीर झाला आहे. नवी दिल्ली येथील या संस्थेकडून हा सन्मान प्रदान केला जाणार आहे.



कामगार संघटनांमध्ये पंचवीस वर्षांचा लढाऊ प्रवास, इतिहासाचा सखोल अभ्यास आणि पस्तीस वर्षांच्या साहित्यिक कार्याचा समृद्ध ठेवाया सर्व उपक्रमांच्या एकत्रित मूल्यांकनातून बोऱ्हाडे यांची पुरस्कारासाठी निवड झाली आहे. १९९२ मध्ये इलेक्ट्रोसॉफ्ट वर्कर्स फेडरेशनच्या अध्यक्षपदापासून बोऱ्हाडे यांचा कामगार चळवळीतील प्रवास सुरू झाला. हिंदुस्थान अँटिबायोटिक्समधील दीर्घकाळ नेतृत्व. २००३ मधील एच. ए. कंपनीचा देशभर गाजलेला आंदोलन. सेंच्युरी एन्का, बजाज ऑटो, फोर्स मोटर्स आदी कंपन्यांतील कामगारांसाठी यशस्वी लढे. चाकण औद्योगिक पट्ट्यात अनेकांना न्याय मिळवून देण्यात मोलाची भूमिका. एच. ए. कामगार लढ्यावर जमशेदपूरच्या प्रा. शामसुंदर यांनी संशोधनप्रबंध लिहून बोऱ्हाडे यांच्या नेतृत्वाची नोंद शैक्षणिक पातळीवरही नोंदवली आहे. २०१८ मध्ये पिंपरी-चिंचवडमध्ये संघटित व असंघटित कामगारांची पहिली मोठी परिषद भरविली. माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील कामगारांच्या प्रश्नांवर प्रथमच या परिषदेत चर्चा झाली आणि तिचे पडसाद संसदेतही उमटले.

बोऱ्हाडे यांना इतिहासाची आणि गडकिल्ल्यांची विलक्षण आवड. महाराष्ट्रातील २०० हून अधिक किल्ल्यांचे त्यांनी भ्रमण केले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या दक्षिण मोहिमेवरील त्यांचा विशेष अभ्यास 'जिंजी, वेल्लोर, तंजावर' या पुस्तकातून प्रकाशित झाला असून ते भारत इतिहास संशोधक मंडळातही सक्रिय आहेत.

साहित्य, इतिहास, गिर्यारोहण आणि कामगार चळवळ अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केलेल्या बोऱ्हाडे यांच्या समग्र योगदानाचा विचार करून समितीने त्यांना हा प्रतिष्ठेचा सन्मान जाहीर केला आहे. लवकरच नवी दिल्लीतील विशेष समारंभात त्यांचा गौरव करण्यात येणार आहे.

१९८९-१९९९ : महाराष्ट्र साहित्य परिषदेचे पिंपरी-चिंचवड कार्यवाह.
१९९२ : कामगार साहित्य परिषदेची स्थापना व अध्यक्षपद. मागील काही वर्षांत 'इंद्रायणी साहित्य परिषद' स्थापन करून मोशी येथे चार साहित्य संमेलनांचे आयोजन. १६ पुस्तके प्रकाशित. 'राष्ट्रभक्तांची स्मरणगाथा' पुस्तकाला संत नामदेव राष्ट्रीय पुरस्कार. विविध वृत्तपत्रांत सातत्याने स्तंभलेखन व शेकडो व्याख्याने

# आव्हाड, तनपुरे यांची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड; कुराश व पॅरालिम्पिक स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी

**अहमदनगर । रयत समाचार**

इंदापूर येथे झालेल्या शालेय राज्यस्तरीय कुराश स्पर्धेत रुपीबाई मोतीलाल बोरा न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी प्रभावी आणि दमदार कामगिरी करत जिल्ह्याचा मान वाढवला आहे. विद्यालयातील आरुषी लांडगे, सार्थक तनपुरे आणि युवराज आव्हाड यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता.



१४ वर्षाखालील मुलांच्या ५० किलो वजनगटात युवराज आव्हाडने कोल्हापूर, मुंबई, सातारा आणि बीडच्या दिग्गज खेळाडूंना पराभूत करत राज्यस्तरावर प्रथम क्रमांक पटकावला. त्याच्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर त्याची उत्तर प्रदेशातील सारंगपूर येथे होणाऱ्या शालेय राष्ट्रीय कुराश स्पर्धेसाठी निवड झाली आहे. १४ वर्षाखालील मुलांच्या ५५ किलो वजनगटात सार्थक तनपुरेने सुरुवातीपासूनच आघाडी राखत उत्तम खेळ सादर केला आणि राज्यस्तरावर द्वितीय क्रमांक मिळवला. मुंबई, बीड आणि सोलापूरच्या प्रतिस्पर्ध्यांवर मात करत त्याने आपली गुणवत्ता सिद्ध केली.

या सर्व खेळाडूंचा सत्कार संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छाया फिरोदिया यांच्या हस्ते करण्यात आला. त्यांनी विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे कौतुक करत राष्ट्रीय पातळीवरही उत्तुंग यश मिळवण्याच्या शुभेच्छा दिल्या. संस्थेचे सहकार्यवाह गौरव फिरोदिया, नियामक मंडळाचे चेअरमन अशोक मुथा, शाळा समितीचे चेअरमन भूषण भंडारी, सदस्य गौरव मिरीकर, विश्वस्त सुनंदा भालेराव, मुख्याध्यापक अजय बारगळ, उपमुख्याध्यापक आर. एन. भांड आणि पर्यवेक्षक व्ही. बी. गिरी यांनी खेळाडू व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

खेळाडूंना क्रीडा शिक्षिका अंजली देवकर व अमोल धानापूर्ण यांचे मार्गदर्शन लाभले असून त्यांच्या प्रशिक्षणाखाली विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्पर्धे पर्यंत मजल मारली आहे.

विद्यालयातील रुद्र मनोहर गायकवाड याने १७ वर्षाखालील मुलांच्या राज्य पॅरालिम्पिक स्पर्धेत चमकदार कामगिरी केली. ॲथलेटिक्समधील १०० मी. आणि २०० मी. धावण्याच्या दोन्ही उपांत्य फेऱ्यांत रुद्रने प्रथम क्रमांक मिळवत सर्वांचे लक्ष वेधले. त्याच्या या दुहेरी यशामुळे त्याची दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय पॅरालिम्पिक स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



# प्रदूषण रोखण्यासाठी तातडीने कडक कारवाई करा- जाणीव फाऊंडेशन

**अहमदनगर । रयत समाचार**

राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिनानिमित्त वाढत्या ध्वनी, वायू आणि जल प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न पुन्हा एकदा समोर आला आहे. जिल्ह्यात अनधिकृतरित्या वापरले जाणारे डीजे सेट्स, कार्यक्रमांमध्ये उडवले जाणारे फटाके, तसेच काही मंगल कार्यालयांमध्ये रात्री उशिरापर्यंत सुरू राहणारे कार्यक्रम यामुळे निर्माण होणारे प्रदूषण सर्वसामान्यांच्या जीवनावर मोठा परिणाम करत आहे. विशेषतः आजारी नागरिक, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि अभ्यास करणारे विद्यार्थी या प्रदूषणामुळे गंभीर त्रास सहन करीत आहेत. निर्धारित वेळमर्यादा व ध्वनीमर्यादा न पाळता रात्री उशिरा मोठ्या आवाजात वाजवले जाणारे डीजे, फटाक्यांचा दणदणाट यामुळे मानसिक-शारीरिक आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली.दुसऱ्याला त्रास देऊन होणारा आनंद हा आनंद नसतो, या शब्दांत नागरिकांच्या संवेदनांना वाचा फोडत जाणीव फाऊंडेशनने प्रशासनासमोर ठोस मागण्या मांडल्या. वाढत्या व्यावसायिक स्पर्धेत समाजभान हरवले जात असल्याची खंतही या निवेदनात व्यक्त करण्यात आली. जाणीव फाऊंडेशनने केलेल्या प्रमुख मागण्या अशा आहेत, अनधिकृत डीजे आणि ध्वनीप्रदूषण करणाऱ्या साधनांवर तत्काळ जप्तीची कारवाई करावी. मंगल कार्यालये, लॉन्स व इव्हेंट ठिकाणांसाठी निश्चित केलेली वेळमर्यादा काटेकोरपणे अंमलात आणावी. फटाके फोडण्याच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर तात्काळ दंडात्मक कारवाई करावी. परवानगीशिवाय आयोजित सार्वजनिक कार्यक्रमांवर तत्काळ गुन्हे दाखल करावेत. पर्यावरणपूरक पद्धतींबाबत जनजागृतीसाठी मोहिमा राबवाव्यात. जिल्ह्यातील वाढत्या प्रदूषणाला आळा घालण्यासाठी त्वरित, प्रभावी आणि कठोर कारवाईची अपेक्षा प्रशासनाकडून व्यक्त करण्यात आली.निवेदन जाणीव फाऊंडेशनतर्फे कर सल्लागार विकास जोशी, वाहन व्यावसायिक दिपक भंडारी, प्रगतीशील शेतकरी शिवशर्मा चेमटे, ॲड. विक्रम वाडेकर, बांधकाम व्यावसायिक प्रदीप वाखुरे, छायाचित्रकार राहुल जोशी, उद्योजक शंतनू पांडव, उद्योजक संजय माने, विमा सल्लागार राहुल काळे, उद्योजक विकास गायकवाड, ॲड. इंजि. कैलाश दिघे यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपविभागीय अधिकारी रविराज पाटील, पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे आणि महानगरपालिका आयुक्त यशवंच डांगे यांना दिले. या गंभीर प्रश्नांवर हे तीनही प्रशासकीय अधिकारी येत्या काळात काय कारवाई करतात हे पहाणे महत्वाचे ठरणार आहे.

दैनिक रयत समाचार
अहमदनगर जिल्हा आवृत्तीसाठी...
त्वरित नियुक्त करणे आहेत
१४ तालुका प्रतिनिधी, १४ शहर प्रतिनिधी, १५ प्रेस फोटोग्राफर, १४ तालुक्यात किमान ५ ते ७ ग्रामीण वार्ताहर.
अनुभवींना प्राधान्य!
इच्छुकांनी जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर सात दिवसाच्या आत मानधनाच्या अपेक्षेसह मा. संपादक यांच्या नावे अर्ज करावा अर्ज या क्रमांकावर व्हॉटसअप करावा : 8805401800
आम्ही काय देणार
* पत्रकार म्हणून निवड झाल्यानंतर नियुक्तीपत्र, (Appointment letter) दैनिकाचे ओळखपत्र (PRESS I. Card)
एकाच वेळी प्रिंट व डिजिटल मिडियात काम करण्याची संधी.

# दीपोत्सवात झळकली वारशाची किल्लेसंस्कृती संजीवनी संस्थेच्या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद



**मुंबई । रयत समाचार**

दिवाळीच्या सणात परंपरा, संस्कृती आणि सर्जनशीलता यांचा सुंदर मिलाफ अनुभवत संजीवनी सेवाभावी सामाजिक संस्था, गुंदवली, अंधेरी आयोजित दीपावली किल्ला बांधणी स्पर्धा २०२५ चा भव्य समारोप आणि जाहीर बक्षीस वितरण समारंभ रविवारी ता.३० नोव्हेंबर रोजी उत्साहात पार पडला. परिसरात उभारण्यात आलेल्या कलात्मक किल्ल्यांनी मराठी वारशाची दिमाखदार ओळख अधिक उजळून निघाली.

मुलांच्या कल्पकतेने आणि तरुणांच्या मेहनतीने उभारलेले किल्ले पाहताना उपस्थितांच्या टाळ्यांचा कडकडाट थांबेनासा झाला. या स्पर्धेत पाच संघांना पारितोषिके देण्यात आली.प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवलेल्या संघांना रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. उत्तेजनार्थ दोन संघांचा सन्मानही विशेष गौरवाने करण्यात आला. सहभाग महत्त्वाचा या मूल्याला जपत सर्वच स्पर्धक संघांना सन्मानपत्र देण्यात आल्याने आनंद आणि प्रेरणा अधिक दुणावली.

कार्यक्रम सुरळीत पार पाडण्यासाठी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी मनापासून परिश्रम घेतले. अध्यक्ष गणेश निकम, उपाध्यक्ष जगदिश जयसिंग कुवळेकर, कार्याध्यक्ष सुनिल लक्ष्मण प्रभू, सचिव आनंदराव जाधव, उपसचिव दिलीप सकपाळ, खजिनदार मोहन दाबेकर, उप-खजिनदार तुकाराम सणस, सोशल मीडियाप्रमुख व जनसंपर्क अधिकारी दिपक राणे यांचा सक्रिय सहभाग विशेष ठरला.

महिला कार्यकारी अधिकारी सुवर्णा खिडबिडे तसेच कार्यकारी संघटक सुभाष सकपाळ, कंचन तेली, राजेंद्र हापटे, निलेश बाकाडे, जितेंद्र जुनघरे, सतीश यादव आणि अर्चना पांचाळ यांनी आयोजनात मोलाचे योगदान दिले. समारंभाला नाटककार व ज्येष्ठ पत्रकार दशरथ राणे, समाजसेवक उद्योजक संतोष रहाटे आणि समाजसेविका तरुणा कुंभार यांच्या उपस्थितीने कार्यक्रम अधिक प्रतिष्ठित झाला.

स्पर्धेचे परीक्षण साहित्यिक पत्रकार गुरुदत्त वाकदेकर यांनी केले. त्यांच्या सूक्ष्म, न्याय्य आणि अभ्यासपूर्ण परीक्षणामुळे विजेत्यांची निवड पारदर्शक आणि उच्चदर्जाची ठरली.

दिवाळीचा आनंद, किल्ला संस्कृतीचा परंपरागत वारसा आणि नव्या पिढीची सर्जनशीलता या स्पर्धेत उत्कृष्टरीत्या अनुभवायला मिळाली. समाजातील एकतेची जाणीव दृढ करणारा, परंपरेचा अभिमान जागवणारा आणि नव्या पिढीला प्रेरणा देणारा हा उपक्रम खरेच अविस्मरणीय ठरला. संजीवनी सेवाभावी सामाजिक संस्थेची किल्ला बांधणी स्पर्धा, दिवाळीला संस्कृतीचा नवा प्रकाश देणारा एक भव्य सोहळा!

# आत्मा मालिकच्या बजरंग शिरसाटला सुवर्णपदक

**पाथर्डी । नितीन गटाणी**

तालुक्यातील टाकळी मानूरचा सुपुत्र आणि आत्मा मलिक शिक्षण संस्थेचा विद्यार्थी बजरंग शिरसाट यांनी उत्तर महाराष्ट्र कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक पटकावत उल्लेखनीय यश मिळवले आहे. नाशिक येथे नुकतीच झालेल्या उत्तर महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा २०२५ मध्ये बजरंगने उत्कृष्ट खेळ सादर केला.



बजरंग हा टाकळी मानूर येथील बाजार समितीचे माजी सभापती गहिनीनाथ शिरसाट व जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या उज्वला शिरसाट यांचा मुलगा आहे. आंतरराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षक विवेक नायकल यांच्या मार्गदर्शनाखाली त्याने कौशल्यपूर्ण खेळ करत सुवर्णपदकावर नाव कोरले. स्पर्धेत आत्मा मलिक कुस्ती केंद्रातील मल्लांनीही कौतुकास्पद कामगिरी केली.

या स्पर्धेत केंद्राने एकूण ६ पदकांची कमाई केली. त्यात ३ सुवर्ण, २ रौप्य आणि १ कांस्य पदकांचा समावेश आहे. सुवर्णपदक विजेत्यांमध्ये सत्यम चौधरी (३५ किलो), बजरंग शिरसाट (५० किलो) आणि शुभम लांडगे (७० किलो) यांचा समावेश आहे. तर रौप्यपदक श्रावण गायकवाड (५५ किलो) आणि वरुण फुलपगारे (७० किलो) यांनी मिळवले. केसरी गटात महेश फुलमाळी यांनी कांस्यपदक मिळवून केंद्राला मान मिळवून दिला.